# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 13 November 2024
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक – १३ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग-छत्रपती संभाजीनगरात उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या सभा
- निवडणूक नि:पक्षपाती वातावरणात होण्यासाठी निवडणूक आयोगाची काटकोर तयारी
- कोणत्याही आरोपीची मालमत्ता नष्ट करून शिक्षा देण्याचा अधिकार सरकारला नाही-सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा
- कोचिंग संस्थांनी अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांशी संबंधित खरी माहिती जाहीर करण्याचे केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाचे निर्देश

आणि

- सुमारे दीड महिन्याच्या बाळाची विक्री करणाऱ्या चौघांना ठाणे पोलिसांकडून अटक

****

राज्यभरात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला अत्यंत वेग आला असून सगळ्या प्रमुख पक्षांच्या नेत्यांच्या राज्यभरात ठिकठिकाणी सभा होत आहेत. भारतीय जनता पक्षाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज दोंडाईचा इथे सभा घेतली. शिंदखेडा मतदारसंघातले भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार जयकुमार रावल यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या या सभेत, महाराष्ट्रात परत महायुतीचंच सरकार येण्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज चंद्रपूर जिल्ह्यात दुर्गापूर इथे प्रचार सभा घेतली. बल्लारपूर मतदारसंघाचे भाजप-महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या या सभेत, देश, राज्य आणि जिल्ह्याच्या गतिमान विकासासाठी महायुतीला पर्याय नाही, असा दावा गडकरी यांनी केला.

शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज पालघर इथे राजेंद्र गावीत यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा झाली.

वाशीम जिल्ह्यात बंजारा समाजाची काशी, अशी ओळख असलेल्या पोहरादेवी इथे आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा झाली. कारंजा लाडच्या महायुतीच्या उमेदवार सई डहाके, वाशीमचे उमेदवार श्याम खोडे आणि रिसोडच्या शिवसेनेच्या उमेदवार भावना गवळी यांच्या प्रचारासाठी त्यांनी ही सभा घेतली. यावेळी, नुकताच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा राजीनामा दिलेले पोहरादेवी इथले महंत सुनील महाराज राठोड यांनी योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला.

भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नांदेड जिल्ह्यातल्या मुखेड इथं प्रचार सभा घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं भाजपाचं सरकार खऱ्या अर्थानं संविधानाचं रक्षण करत आहे, असं प्रतिपादन करत, महाविकास आघाडी याबाबत खोटे आरोप करत आहे, असं फडणवीस यांनी म्हटलं. अकोल्यात मूर्तिजापूर इथंही फडणवीस यांनी सभा घेतली.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची आज लातूरमध्ये प्रचार सभा झाली. भाजपानं मतदारांना दिलेली आश्वासनं पूर्ण केली नाहीत, अशी टीका त्यांनी केली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यवतमाळ जिल्ह्यातल्या आर्णी केळापूर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस मविआचे उमेदवार जितेंद्र मोघे यांच्या प्रचारासाठी घाटंजी इथे सभा घेतली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उद्या गुरुवारी जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सभा होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणेसह सर्वच व्यवस्थेवर प्रशासनाची करडी नजर आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चिकलठाणा परिसरासह जालना इथंही सभा होणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची उद्या मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर सभा होणार आहे.

****

प्रचाराच्या या रणधुमाळीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपणच मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार असल्याचा दावा केल्यामुळे महाविकास आघाडीत गोंधळाचं वातावरण पसरल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. याआधी, महाविकास आघाडीतला जो पक्ष निवडणुकीत उत्तम कामगिरी करेल, त्या पक्षाचा मुख्यमंत्री असेल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी म्हटलं होतं.

****

विधानसभेची निवडणूक नि:पक्षपाती वातावरणात व्हावी यासाठी भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगानं काटकोरपणे तयारी केली असून जिल्हास्तरावर यंत्रणा सज्ज झाली आहे. यंत्रणेच्या या तयारीच्या अनुषंगानं माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय निर्मित `दिलखुलास` या कार्यक्रमात विशेष मुलाखतींचं प्रसारण होणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. आज सकाळी प्रसारित झालेल्या मुलाखतीत राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर पूर्णपणे सुरक्षित असून सर्वोच्च न्यायालयानेही त्यावर शिक्कामोर्तब केल्याचं सांगितलं –

> ***आपल्या देशातली सर्वोच्च न्यायव्यवस्था म्हणजे सर्वोच्च न्यायालय आहे. त्यांच्याकडे ई व्ही एम बद्दल च्या चाळीस केसेस आत्तापर्यंत झालेल्या आणि वेगळ्या वेगळ्या पैलूंवरती त्या केसेस होत्या. सुप्रीम कोर्टाने तांत्रिक तज्ञांच्या मदतीने आणि कायद्याच्या मदतीने या केसेसचा निकाल दिलेला आहे. आणि या चाळीसही केसेसमध्ये सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे सांगितलेलं आहे की ई व्ही एम टँपर करता येत नाही. त्याचा वापर योग्य आहे. आणि झालेलं मतदान ते योग्य पद्धतीने दाखवतं. त्यामुळे सर्वोच्च न्याय व्यवस्थेनं प्रशस्तीपत्र दिलेलं आहे. मतदारांनी स्वीकारलेलं आहे. त्याच ई व्ही एम चा वापर आपण महाराष्ट्रामध्ये करणार आहोत.***

दरम्यान, या सदरात येत्या शनिवारी पंधरा तारखेला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांची, आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या वृत्त विभागाचे प्रमुख समरजीत ठाकूर यांनी घेतलेली मुलाखत प्रसारित होणार आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज अहिल्यानगर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

हिंगोलीचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हिंगोली जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान सुरळीत होण्यासाठी पोलीस यंत्रणेनं केलेल्या तयारीची माहिती दिली तसंच मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं, ते म्हणाले –

> ***लोकशाहीच्या या उत्सवात आपण सर्वांनी सहभागी व्हावं यासाठी प्रशासन तयार असून, आपल्याला बाहेरून चार कंपनीज् आणि मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ मिळालेलं आहे. निष्पक्षपणे मतदान करता यावं यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहे. आपल्याला आपला अधिकार निष्पक्षतेने, निर्भयतेने बजावता यावा यासाठी आम्ही सज्ज आहोत. आपण सुद्धा आपल्या अधिकाराचा वापर करावा.***

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निवडणूक चिन्हाबाबतच्या वादाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. शरद पवार यांचे फोटो आणि व्हिडीओ न वापरण्याच्या सूचना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेते आणि कायकर्त्यांना देण्यात याव्यात असं न्यायालयानं आज सांगितलं. अजित पवार गटाला घड्याळ या निवडणूक चिन्हावर विधानसभा निवडणूक लढवण्यास प्रतिबंध घालावा, अशी मागणी शरद पवार गटानं एका याचिकेद्वारे न्यायालयात केली आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी पुढच्या आठवड्यात होणार आहे.

****

कोणत्याही आरोपीची मालमत्ता नष्ट करून शिक्षा देण्याचा अधिकार सरकारला नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. सरकारकडून अशा प्रकारे मालमत्ता पाडल्या जाण्याबाबत न्यायालयानं मार्गदर्शक तत्वं जारी केली आहेत. पाडकाम करण्याआधी आरोपीला कारणे दाखवा नोटीस बजवावी, असं न्यायालयानं म्हटलं असून, या नोटीशीवर आरोपीनं पंधरा दिवसांच्या आत किंवा स्थानिक प्रशासनानं घालून दिलेल्या कालमर्यादेत उत्तर देणं अपेक्षित आहे. कायदेशीर प्रक्रियेशिवाय अशी कारवाई केल्यास ती सरकारची मनमानी समजली जाईल, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

****

सर्व कोचिंग संस्थांनी आपले अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांशी संबंधित खरी माहिती जाहीर केली पाहिजे, असे निर्देश केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं दिले आहेत. कोचिंग संस्थांकडून केल्या जाणाऱ्या भ्रामक किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या विरोधात या प्राधिकरणाच्या सचिव निधी खरे यांनी आज मार्गदर्शक सूचना जारी केले. अशा संस्थांनी आपल्या सेवा, सोयी आणि पायाभूत सुविधांबाबतही खरी माहिती द्यावी आणि या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या तक्रारी निवारण्यासाठी सुयोग्य प्रणाली असावी, असं या नियमावलीत म्हटलं आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी राष्ट्रीय ग्राहक मदतवाहिनी सुरू केल्यापासून अशा संस्थांकडून विद्यार्थ्यांना एक कोटी रुपयांहून जास्त रक्कम परत मिळाल्याचंही खरे यांनी सांगितलं.

****

सुमारे दीड महिन्याच्या बाळाची चार लाख रुपयांत विक्री करणाऱ्या चौघांना ठाणे पोलिसांनी अटक केली, यामध्ये बाळाच्या आईचाही समावेश आहे. डोंबिवलीतली एक महिला कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता, बाळाची विक्री करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, त्याआधारे पोलिसांनी सापळा रचून या चौघांना अटक केली, तसंच सदरील बाळाची आणि त्याच्या पाच वर्षांच्या भावाची डोंबिवलीतील एका बालकाश्रमात आणि या भावंडांच्या नऊ आणि सात वर्षांच्या दोन बहिणींना अंबरनाथ इथल्या एका बालसदनात ठेवण्यात आलं आहे.

****

राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात आली. विधानभवन परिसरात असलेल्या पाटील यांच्या पुतळ्याला विधानमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे आणि डॉक्टर विलास आठवले यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

****

नंदुरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुवा विधानसभा मतदार संघातल्या अतिदुर्गम असलेल्या पाच मतदान केंद्रांची मतदानाची वेळ सकाळी सात ते दुपारी तीन अशी निश्चित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉक्टर मिताली सेठी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

****